# बी.ए. भाग -१, सत्र - २
# विषय – मराठी (आवश्यक)
## पाठ्यपुस्तक – शब्दसंहिता

## घटक – निबंध लेखन

प्राध्यापकाचे नाव – डॉ. अमोल सुभाष कवडे
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय वाई.

# प्रास्ताविक

- निबंध हा मराठी भाषेतील लोकप्रिय गद्यलेखन प्रकार आहे.
- ‘नि+बंध = बांधणे असा त्याचा अर्थ आहे.
- मराठी शब्द कोशात निबंध या शब्दाचा अर्थ नियमबद्ध असणारा लेख, नीटपणे पक्का जोडलेला लेख असा आहे.
- व्याख्या – निवडक शब्दात बांधलेला, मांडलेला, विवेचन केलेला विषय म्हणजे निबंध.
- बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो.टिळक. गो.ग. आगरकर यांच्यापासून सुरु झालेली निबंधाची परंपरा श्री.म. माटे, वि.स.खांडेकर, साने गुरुजी, विनोबा भावे, अनंत काणेकर यांनी समृद्ध केली.
- आजच्या स्पर्धेच्या युगात निबंध लेखनाला खूप महत्व आहे.

# निबंध लेखनाचे स्वरूप

- निबंध हा गद्य लेखन प्रकार आहे.
- कथा, कादंबरी, नाटक, चरित्र या गद्य प्रकारात कथानकाला विशेष प्राधान्य असते पण निबंधात विषयाला प्राधान्य असते.
- निबंधाच्या विषयाला कोणत्याही प्रकारचे मापदंड नाहीत.
- सामान्यातील सामान्य घटना तसेच सामान्यातील असामान्यत्व देखील निबंधाचा विषय होऊ शकतो.
- निबंधाला शब्द मर्यादेचे बंधन असत नाही.
- ५०० ते १००० शब्द – सामान्य निबंध, १००० ते ३००० शब्द – दीर्घ निबंध
- निबंधात मुख्य विषयाला अनुसरून विचारांच्या क्रमबद्ध मांडणीला महत्वाचे स्थान असते.

# निबंध लेखनाचे महत्व

- व्यक्ती आपले विचार व्यक्त करण्यासाठी मौखिक आणि लिखित आविष्कार यांचा उपयोग करते.
- एखादी व्यक्ती या दोन्ही अविष्कार तंत्रांचा वापर किती सक्षमपणे करते यावर तिचे व्यावहारिक यश अवलंबून असते.
- सर्वसाधारणपणे निबंध लेखनाद्वारे व्यक्तीच्या लेखन कौशल्याची सहज पडताळणी करता येते.
- निबंध लेखनाद्वारे व्यक्तीचे ज्ञान, अनुभव, विचार व्यक्त करण्याची पद्धत, मांडणीतील सुत्रबद्धता यांची ओळख पटते.
- निबंध हा व्यक्तीच्या लेखन कौशल्याचा आरसा आहे.
- सूत्रबद्ध विचार करण्याची सवय व लिखाणाचा सराव केला तर विध्यार्थ्यांमध्ये 'निबंध लेखन कौशल्य' सहज विकसित होते.

# निबंधाची प्रमुख अंगे

- आरंभ – विषयाचा परिचय होतो, वाचकाची वाचनाची उत्कंठा निर्माण होते.
- मध्य – निबंधाचा महत्वाचा भाग, विषयवस्तूचे विस्तृत रूप
- समारोप – निबंधाचा शेवटचा भाग, निबंधाचा सार एकवटलेला असतो.

# निबंधाची सुरवात आणि शेवट

- एखाद्या वेधक वाक्याने, शुभाषिताने, म्हणी, सुविचार, अभंग यांचा वापर करून निबंधाची सुरवात करता येते.
- एखाद्या संवादाने सुरवात आणि शेवट करता येईल.
- एखादे अवतरण देऊनही आकर्षक सुरवात आणि परिणामकारक शेवट करता येते.

# निबंधाची भाषा

- निबंध लेखनात भाषेला फार महत्व असते.
- भाषेवरून निबंधकाराचा व्यासंग, विचार करण्याची क्षमता, मुद्दा पटवून देण्याची पद्धत समजून येते.
- निबंधाची भाषा प्रभावी असावी, तिच्यामध्ये क्लिष्टता असू नये.
- भाषा सुबोध व रसाळ असावी.योग्य शब्दांची निवड, शब्दांची मांडणी, विविध वाक्यप्रचाराचा वापर, थोरामोठ्यांची अवतरणे, उद्गार, सुविचार, म्हणी यांचा योग्य वापर यामध्ये निबंधाच्या भाषेचे यश दडलेले असते.

# निबंधाचे प्रकार

- वर्णनात्मक निबंध
- चिंतनात्मक निबंध
- कल्पनाप्रधान निबंध
- आत्मवृत्तपर निबंध
- व्याक्तीचित्रनात्मक निबंध
- चरित्रात्मक निबंध
- लघुनिबंध